दैनिक सकाळ दि. ९/८/२०१६

# डॉल्बी लावल्याबद्दल १४० जणांवर गुन्हे

## शिराळा नागपंचमी मिरवणुका : १४ डॉल्बी, बँजोचे साहित्य जप्त

सकाळ वृत्तसेवा

शिराळा, ता. ८ : येथील नागपंचमीनिमित्त काढलेल्या मिरवणुकीत ध्वनी मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या १४ डॉल्बी व बँजोवर कारवाई करून डॉल्बी चालक, मालक, मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्षांसह सदस्यांवर असे एकूण १४० जणांवर शिराळा पोलिसांत गुन्हे दाखल झाले.

रविवारी नागपंचमीनिमित्त नागप्रतिमेच्या मिरवणुका काढल्या. बँजो व डॉल्बीधारकांची वाहने व डॉल्बी पोलिसांनी चौकशीसाठी मिरवणूक संपल्यानंतर ताब्यात घेतली. उपविभागीय पोलिस अधीक्षक वैशाली शिंदे स्वतः होत्या. ही कारवाई जिल्हापोलिस अधीक्षक दत्तात्रय शिंदे यांच्या आदेशाने केली.

> सार्वजनिक पीडा निर्माण करणाऱ्या सदरच्या ध्वनिक्षेपण यंत्रणा जप्त करण्याचे काम सुरू असून डॉल्बी व वाद्ये ताब्यात घेण्यासाठी ठिकठिकाणी तपास पथके रवाना झाली.
> **प्रताप पोमण**, पोलिस निरीक्षक, शिराळा.

याबाबत सहायक पोलिस निरीक्षक जीवन राजगुरू, व्ही. एन. घाडगे, एम. जी. नदाफ, एस. बी. शिरतोडे, ए. टी. सुनगारे, व्ही. एन. घाडगे यांनी फिर्याद दिली. पोलिसांनी डॉल्बी, वाहने व इतर साहित्य जप्त केले. कारवाईत गणेश नागराज मंडळ, सिद्धचैतन्य नागराज मंडळ, शिवशक्ती नागराज मंडळ, सिद्धेश्वर नागराज मंडळ, आंबामाता नागराज मंडळ, यंग निकम नागराज मंडळ, राजेप्रतिष्ठान नागराज मंडळ, आनंद नागराज मंडळ, हनुमान नागराज मंडळ, साई नागराज मंडळ, यंग राजकमल नागराज मंडळ, कच्च्याड युवा शक्ती नागराज मंडळ, कीर्तीकुमार/शिवसेना नागराज मंडळ, रेणुका नागराज मंडळ या नागराज मंडळांचा समावेश आहे.

### २१ दिवसांत दुसरी कारवाई

मांगले येथे बेंदरानिमित्त काढलेल्या बैलांच्या मिरवणुकीत ध्वनी मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या ७ डॉल्बी व वाहने जप्त करून डॉल्बी चालक, मालक, मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्षांसह सदस्यांवर असे [illegible] जणांवर गुन्हे दाखल केले.

दैनिक लोकमत दि. ९/८/२०१६

# चौदा डॉल्बी धारकांवर शिराळ्यात गुन्हा दाखल

**शिराळा :** नागपंचमी उत्सवामध्ये ध्वनी मर्यादेचे उल्लंघन केल्याप्रकरणी १४ डॉल्बीधारक तसेच नाग मंडळांच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मर्यादेपेक्षा जादा आवाजात डॉल्बी लावल्याप्रकरणी सोमवारी १४ डॉल्बीधारक व नाग मंडळांचे कार्यकर्ते यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत. गणेश मंडळ, सिध्दी चैतन्य, शिवशक्ती, सिध्देश्वर, अंबामाता, निकम, राजे प्रतिष्ठान, आनंद मंडळ, साई, हनुमान, यंग राजकमल, कच्चाड, कीर्तीकुमार, रेणुका या मंडळांच्या मिरवणुकीवेळी ध्वनी मर्यादेपेक्षा जादा आवाजात डॉल्बी लावल्याने डॉल्बीमालक, चालक, तसेच मंडळांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकर्ते यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये ट्रॅक्टर, ट्रॉली, ट्रक, तसेच जीप यांचे नंबर मिळविण्याचे काम रात्री उशिरापर्यंत चालू होते.(वार्ताहर)

Scanned by CamScanner